# सं पा द की य

## पाऊल पडते मागे

जातीचा उल्लेख ही अलीकडे एक स्फोटक बाब बनलेली आहे. तीन वर्षांपूर्वी ट्वीटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॅक डोर्सी यांनी भारतात एका सभेत *स्मॅश ब्रॅह्मॅनीकल पॅट्रीअॅर्की* असा फलक उंचावला होता. त्यांच्यावर राजकुमार शर्मा यांनी जोधपूरच्या न्यायालयात खटला दाखल केला होता. ब्राह्मण ही एक प्रतिष्ठित जात आहे, असे त्यांनी तक्रारीत लिहिले. अर्थात, सदरील फलकामुळे जातीय अथवा धार्मिक भावना दुखावल्या जात नाहीत, असे न्यायालयाने सांगितले, हा भाग निराळा!

अलीकडे, अशीच एक घटना बंगळुरू शहरात घडली. 'ब्राह्मणवाद' या शब्दप्रयोगाबाबत कन्नड अभिनेते चेतन कुमार यांची पोलिसांनी चौकशी केली. त्यांच्या विरोधात कर्नाटक राज्य ब्राह्मण डेव्हलपमेंट बोर्डाचे अध्यक्ष सच्चिदानंद मूर्ती आणि आणखी एका संस्थेने तक्रार केली होती.

बी. एस. येडियुरप्पा सरकारने जुलै २०२०मध्ये कर्नाटक राज्य ब्राह्मण डेव्हलपमेंट बोर्डाची स्थापना केली होती. अलीकडे या बोर्डाने ब्राह्मण मुलींनी ब्राह्मण मुलांसोबत विवाह करण्यासाठी उत्तेजनपर 'मैत्रेयी योजना' आणि 'अरुंधती' योजना ह्या दोन

योजना जाहीर केल्या आहेत. पहिल्या योजनेत आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या ५५० ब्राह्मण वधूंच्या लग्नासाठी प्रत्येकी २५,००० रुपये दिले जातील आणि दुसऱ्या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीच्या ब्राह्मण पुरोहिताशी लग्न करणाऱ्या २५ ब्राह्मण स्त्रियांना ३ लाख रुपये दिले जाणार आहेत.

कर्नाटक सरकारच्या या निर्णयातून अनेक प्रश्न उपस्थित होतात. आधुनिक राज्यसंस्था ही सामंती व्यवस्थेच्या बाजूने असायला हवी, की तिच्या विरोधात? वर निवडण्याचा हक्क हा मुलींचा एक व्यक्ती म्हणूनचा खासगी हक्क आहे की, राज्यसंस्थेला अशा व्यक्तिगत बाबींमध्ये हस्तक्षेप करणे, हे आधुनिक राज्यसंस्थेच्या व्यक्तिगत बाबींसंदर्भात तटस्थ असण्याच्या प्रवृत्तीशी विसंगत आहे? ब्राह्मण पुजारी हे जर गरीब असतील तर त्यांच्या मागासलेपणाला त्यांची जात जबाबदार आहे का? शेतकरी वगैरे जातींमध्येदेखील जुन्या / सामंती शेतीव्यवस्थेत अडकलेल्या मुलांशी लग्न न करण्याची प्रवृत्ती शेतकरी मुलींमध्ये आहे, त्यांच्यासाठीदेखील सरकार अशाच योजना आखणार आहे का? ज्याप्रमाणे कनिष्ठ जातींनी बलुत्याचा ‘अधिकार’ सोडला त्याप्रमाणे ब्राह्मण पुजारी हे पौरोहित्यामुळे गरीब राहत असतील तर त्यांनी ‘पौरोहित्य’ सोडणे श्रेयस्कर नाही का?

कर्नाटकात एकूण मतदार संख्येच्या सुमारे ५ टक्के ब्राह्मण आहेत. २०१८-१९मध्ये मुख्यमंत्री असताना जद (एस)चे नेते एच. डी. कुमारस्वामी यांनी अशा बोर्डाची कल्पना सर्वप्रथम मांडली होती. कुमारस्वामी यांनी बोर्डासाठी २५ कोटी रुपये

बाजूला ठेवणार असल्याचे जाहीर केले होते. वरच्या जातीच्या अनुनयाला सर्वच राज्यांमध्ये उधाण आलेले आहे. मोदी सरकारने वरच्या जातींसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ही योजना केल्यापासून वरच्या जातींसाठी विविध योजना राबविण्याची अहमहमिका सर्वत्र आहे.

आज ब्राह्मण जात ही एका समस्येतून जात आहे. ब्राह्मण जातीचे पुजारी, आचारी, महंत  गरजेचे असलेल्या अनेक संस्थानांमध्ये ब्राह्मण मिळेनासे झालेले आहेत. अल्पवेतन, निरस काम आणि लग्नाची समस्या हे प्रश्न या व्यवसायाशी जुळलेले आहेत. पस्तीस-चाळीस वर्षांचे अविवाहित ब्राह्मण-पुजारी सर्वत्र दिसून येतात. इतर जातींमध्येदेखील पस्तीस-चाळीस वर्षांचे अविवाहित तरुण दिसून येतातच.

ब्राह्मण जात ही आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्वांत आधी आल्यामुळे जातीबाहेर विवाह करण्याचे प्रमाण ब्राह्मण मुलींमध्ये अधिक आहे. अलीकडे ब्राह्मणांच्या संमेलनांमध्ये ब्राह्मण मुलींनी जातीबाहेर लग्न न करण्याविषयीचे आवाहन करण्यात येत आहे. जातीच्या संघटना किंवा जातीची महामंडळे ही जातीच्या, पितृसत्तेच्या संवर्धनासाठीच कार्यरत राहतात.

विवाहसंस्था ही स्त्रियांनी वा पुरुषांनी स्वेच्छेने / आनंदाने स्वीकारलेली संस्था नाही. सामाजिक उत्क्रांतीत खासगी मालमत्ता आणि इतर विषमता उदयास येत असताना त्या विषमतांच्या (वांशिक, वर्गीय, धार्मिक अथवा जातीय) पुनरुत्पादनाची हमी मिळविण्यासाठी कठोर स्वरूपाची विवाहसंस्था उदयास आली. स्त्रियांच्या लैंगिकतेचे नियमन यातून आपोआपच घडून येणार

होते. विवाहसंस्था जात, वर्ग आणि पितृसत्तेचे पुनरुत्पादन करत असते.

याचमुळे विवाहविषयक सुधारणांना भारतात कमालीचा विरोध झाला. विधवाविवाह, बालविवाहविरोध, घटस्फोटाचा अधिकार, समलैंगिक विवाह, लिव्ह-इनमधील संबंधांना मान्यता इत्यादींबाबत कायदेशीर सुधारणांसाठी दीर्घकाळ संघर्ष भारतात सुरू होता. आज या सुधारणांना कायदेशीर मान्यता असली तरी समाजमान्यता अजून पुरेशी मिळालेली नाही. विवाहविषयक प्रकरणं कायद्याच्या कक्षेत आल्यानंतरच ती आधुनिक राज्यसंस्थेच्या काहीशा उदार चौकटीत हाताळली जातात; अन्यथा विवाहविषयक सर्व बाबी ह्या औपचारिक कायद्याच्या कक्षेबाहेर असलेल्या जात, धर्म, संस्कृती, परंपरा यांच्या नियमांनी बद्ध राहतात.

विवाहसंस्थेद्वारे जातपितृसत्तेच्या पुनरुत्पादनाचे कार्य पार पाडून घेण्यात जातीसमर्थकांचे हितसंबंध आहेत. म्हणून, न्यायालयीन वा कायदेशीर प्रक्रियेत प्राप्त करून घेतलेले व्यक्तीचे अधिकार प्रत्यक्षात खारीज करण्यासाठी संस्कृती, जातिसंघटना आणि धर्म यांना जुंपले जाते. आधुनिक राज्यसंस्था ही आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देते; पण त्यासाठी पुढाकार घेत नाही. उलट, आंतरजातीय विवाहांना प्रतिरोध निर्माण करणाऱ्या सामाजिक शक्तींना राज्यसंस्था कधी उघडपणे; तर कधी प्रच्छन्नपणे पाठीशी घालते. भारतात आज अस्तित्वात असलेल्या जातीय दुजाभाव, टोकदार पण निरुपयोगी असलेल्या अस्मितांच्या राजकारणाची सरशी; जात-धार्मिक तेढ व सर्व जातधर्मीय

स्त्रियांची दु:स्थिती यांना राज्यसंस्थेचे हे दोलायमान रूप जबाबदार आहे.

वस्तुत:, पौरोहित्यात फारशी सांस्कृतिक सत्ता राहिलेली नसण्याच्या काळात ब्राह्मणेतरांना व स्त्रियांना पौरोहित्य शिकविण्याची मोहीम संस्कृतीवाद्यांनी घेतली होती. तथापि, ही मोहीम प्रतीकात्मक स्तरावरच राहिली. मंदिरे, सण, व्रत, उत्सव, पारायणे, किर्तने, प्रवचने, पूजाअर्चा यांतून जातधार्मिक व्यवस्थेच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेल्या पूर्वअटींचे पुनरुत्पादन शक्य असल्याने या सांस्कृतिक क्षेत्राचे मोल हा वर्ग जाणून आहे. त्यामुळे पौरोहित्याचे क्षेत्र बिनदिक्कतपणे इतरांना खुले करण्यातही या वर्गाला स्वारस्य नाही. प्रभुत्वासाठी आता या वर्गाने राज्यसंस्थेला वेठीस धरले आहे. भारतीय राज्यसंस्था या वर्गाच्या बाजूने किती झुकेल, यावर भारताचे भवितव्य अवलंबून आहे.

**दिलीप चव्हाण**

प्राध्यापक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ईमेल- dilipchavan@gmail.com